# परदेशी विद्यार्थी हे सांस्कृतिक राजदूतच

पुणे : परदेशांतून भारतात आलेले विद्यार्थी हे केवळ विद्यार्थी नसून ते सांस्कृतिक राजदूत आहेत, असे दै. 'केसरी'चे संपादक डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी शुक्रवारी येथे सांगितले.

'पुण्यातील परदेशी विद्यार्थी' या विषयावर वसंत व्याख्यानमालेत आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादात अध्यक्षपदावरून डॉ. गोखले बोलत होते. परिसंवादात केनिया, जपान, इथिओपिया, सुदान या देशांतील अनुक्रमे जॉर्ज ओबूया, ओगूरा, अदाने मेलेस, ए. जमाल या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. [illegible] संचालिका माधुरी दातार यांनी परिसंवादाचे संचालन केले.

**वसंत व्याख्यानमाला पुष्प चौथे**

अभ्यासासाठी वसतिगृहात राहण्याऐवजी स्वतंत्र खोली असावी, असे आम्हालाहि वाटते, असे सांगून केनियाचा जॉर्ज म्हणाला, 'येथील घरमालक आम्हाला खूप श्रीमंत समजतात. भाड्यापोटी अवास्तव रकमेची ते मागणी करतात. आमच्यापैकी अनेकजण मध्यमवर्गीय कुटुंबातूनच आलेले असतात. विद्यार्थी म्हणून इथल्या लोकांनी आम्हाला मदत करावी. बी. कॉम. च्या वर्गात आपण शिकत असून, महाविद्यालयात आणि बाहेरहि स्थानिक लोक परदेशी विद्यार्थ्यांशी फारसे मिसळत नाहीत, अशी खंत त्याने व्यक्त केली.



वसंतव्याख्यानमालेतशुक्रवारीं पुण्यातील परदेशी विद्यार्थी' या विषयावर झालेल्या परिसंवादात(डावीकडून)केनियाचाजॉर्ज ओबूया, परिसंवादाचे अध्यक्ष 'केसरी'चे संपादक शरच्चंद्र गोखले, जपानचा ओगूरा यांनी भाग घेतला. (शेजारी) परिसंवादाच्या संचालिका माधुरी दातार.

सुदानच्या जमालने येथे येण्यापूर्वी भारत म्हणजे गांधी-नेहरू एवढीच माहिती आपणास होती, असे सांगितले. पुण्यातील रिक्षा-चालकाकडून आपण मोडकेतोडके हिंदी शिकलो. परंतु अनेकदा या लोकांचे हिसकेहि आपणास बसल्याचे कांही किस्सेहि त्याने सांगितले.

येथील लोक श्रीमंत नसले तरी सांस्कृतिकदृष्ट्या ते इतर देशांपेक्षा अधिक संपन्न असल्याचा अनुभव इथिओपियाच्या मेलेसने सांगितला. जे. कृष्णमूर्ति, साईबाबा, भगवद्गीता यांच्याविषयी आणि येथील संस्कृतीविषयी आपणास विशेष आकर्षण असल्याचे त्याने सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गोखले म्हणाले, "आपल्या देशाला नालंदा, तक्षशिला विद्यापीठाची परंपरा आहे. येथे अनेक परदेशी विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत. पुण्यातील सिंबायोसिससारख्या संस्थेने ती परंपरा पुढे चालविली आहे. हे विद्यार्थी शिक्षणासाठी येथे आले असताना ते येथील समाजाचेहि निरीक्षण करीत असतात. खरे शिक्षण हे केवळ पुस्तकातून नाही तर सामाजिक दळणवळणातून खऱ्या अर्थाने होते. या दृष्टीने या विद्यार्थ्यांपर्यंत आपल्या संस्कृतीची अधिकाधिक माहिती पोहोचविण्याची जबाबदारी येथे असलेल्या विद्यार्थ्यांपुरती पुणेकरांवर आहे. आपण त्यांच्याशी कसे वागतो, आपल्याकडून येणारे निरनिराळे अनुभव घेऊनच हे विद्यार्थी त्यांच्या देशात परत जाणार आहेत. तेथे मोठ्या हुद्याच्या जागा भूषविणार आहेत. भविष्यकाळात त्यांच्या देशाबरोबर उत्तम आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण होण्यासाठी आपण आज जागरूक असले पाहिजे".

माधुरी दातार यांनी या विद्यार्थ्यांना येथे एकाकीपणाची जाणीव होऊ नये, यासाठी कांही कुटुंबांनी पुढे होऊन या विद्यार्थ्यांना दत्तक घ्यावे, असे सुचविले.